महा मेट्रो
PUNE METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पुणे मेट्रोला उदंड प्रतिसाद; २.६२ लाखांहून अधिक भाविकांनी केला मेट्रोने प्रवास




पुणे - गणेशोत्सवाच्या वातावरणात पुणेकरांनी प्रवासासाठी पुणे मेट्रोला पसंती दिली आहे. गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी (१४ सप्टेंबर) तब्बल २,६२,६७१ प्रवाशांनी पुणे मेट्रोने प्रवास केला. गतवर्षीच्या पहिल्या दिवशीच्या २,१६,३७४ या प्रवासी संख्येच्या तुलनेत यावर्षी पहिल्याच दिवशी ४६,२९७ हून अधिक प्रवाशांची वाढ झाली असून, एकूण प्रवासी संख्येत तब्बल २१.४०% ने वाढ नोंदवली गेली आहे.

गणेशोत्सवात गर्दीचे नियोजन करण्यासाठी आणि भाविकांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी पुणे मेट्रो प्रशासनाने पूर्ण तयारी केली असून गाड्यांची वारंवारता वाढवून दर ५ मिनिटांनी मेट्रो सेवा उपलब्ध करून दिली आहे.

प्रमुख मेट्रो स्थानकांतील प्रवासी संख्या व टक्केवारीतील वाढ (रात्री ११ वाजेपर्यंत):

एकूण प्रवासी: २,६२,६७१ — [मागच्या वर्षीच्या तुलनेत २१.४०% ने वाढ]
* जिल्हा न्यायालय (District Court) स्थानक (Interchange करणारे प्रवासी): ५८,९४८ प्रवासी — [मागच्या वर्षीच्या ४८,३५९ प्रवाशांच्या तुलनेत २१.८९% ने वाढ]

महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानक: ५१,५३३ (सर्वाधिक प्रवासी) — [मागच्या वर्षीच्या ४२,३३४ प्रवाशांच्या तुलनेत २१.७३% ने वाढ]
पीसीएमसी (PCMC) मेट्रो स्थानक: २५,४२९

रामवाडी मेट्रो स्थानक: २३,६४४

स्वारगेट मेट्रो स्थानक: २१,०९९

पीएमसी (PMC) मेट्रो स्थानक: १९,२६७

गणेशोत्सवासाठी पुणे मेट्रोचे विशेष वेळापत्रक:

दर ५ मिनिटांनी सेवा: गणेशोत्सवाच्या कालावधीत प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेऊन दर ५ मिनिटांच्या अंतराने मेट्रो गाड्या चालवण्यात येत आहेत.

विस्तारित सेवा: भाविकांना रात्रीच्या वेळीही गणपती देखावे पाहणे सुलभ जावे, यासाठी पुणे मेट्रो प्रशासनाने गणेशोत्सवाच्या दिवसांत रात्री उशिरापर्यंत सेवा सुरू ठेवण्याचे नियोजन केले आहे.
पुणे मेट्रोचे भाविक व नागरिकांना महत्त्वपूर्ण

आवाहन:

स्थानकांचे नियोजन: गणपती दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी कसबा पेठ, स्वारगेट, पीएमसी (PMC), डेक्कन जिमखाना आणि छत्रपती संभाजी महाराज उद्यान या मेट्रो स्थानकांचा वापर करावा.

परतीचा प्रवास: गर्दीचे योग्य व्यवस्थापन व्हावे यासाठी महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकाचा वापर प्रामुख्याने परतीच्या प्रवासासाठी करावा.

डिजिटल तिकीट वापर: स्थानकांवरील गर्दी टाळण्यासाठी आणि वेळ वाचवण्यासाठी तिकीट खिडकीसोबतच डिजिटल तिकीट प्रणालीचा (QR कोड/मेट्रो ॲप/व्हॉट्स ॲप) जास्तीत जास्त वापर करावा.
शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि सुरक्षित, जलद व सुखकर प्रवासासाठी नागरिकांनी पुणे मेट्रो सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे मेट्रो प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.